# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
Web portal : hinduprakashwarta.com
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❁ बुधवार, दि. ३० जुलै २०२६ ❁ वर्ष : १ ❁ अंक : १०० ❁ पाने : ४ ❁ किंमत : ४ रू. ❁ Email : hinduprakashvarta@gmail.com



## आयसीसी वर्ल्ड कप 2027 मध्ये होणार मोठे बदल?

मुंबई : आयसीसी वर्ल्ड कप २०२७ सुरू होण्यासाठी अजून खूप वेळ असला , तरी स्पर्धेच्या स्वरुपावरून क्रिकेट विश्वात चर्चा रंगली आहे. वर्ल्ड कप २०२७ दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया संयुक्तपणे आयोजित करणार आहेत. आयसीसीने नव्या स्पर्धा स्वरुपाची घोषणा झाल्यानंतर ऑस्ट्रेलियाचे मुख्य प्रशिक्षक अँ मॅकडोनाल्ड यांनी आयसीसीशी मागणी केली आहे की, वर्ल्ड कप २०२७ साठी १५ ऐवजी १७ खेळाडूंचा संघ ठेवण्याची परवानगी देण्यात यावी.

## बहिणीच्या प्रेमविवाहाचा संताप भावाला अनावर , भावाने थेट...

जळगाव : बहिणीने कुटुंबाच्या इच्छेविरुद्ध दुसऱ्या समाजातील तरुणाशी प्रेमविवाह केल्याचा राग मनात धरून मेहुण्यावर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना जामनेर तालुक्यातील फत्तेपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. या हल्ल्यात प्रशांत चौधरी (२५) हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

# इगतपुरीतील रिसॉर्ट व्यवस्थापनाचा निष्काळजीपणा : साडेतीन वर्षांच्या बालकाचा दुर्दैवी मृत्यू; मालकासह तिघांवर गुन्हा दाखल




**सर्व आरोपींना तत्काळ अटक करण्यात यावी तसेच मृत्युचा सापळा बनले पोहण्याचा तलाव व रिसॉर्ट सिल करावे व गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी करावा.अशी मागणी नागरिकातून करण्यात येत आहे.**

**इगतपुरी / नाशिक :** इगतपुरी येथील 'मानस लाईफस्टाईल रिसॉर्ट' (Manas Lifestyle Resort) मध्ये सुरक्षा रक्षकांची अनुपस्थिती, लाईफगार्डचा अभाव आणि सुरक्षेतील गंभीर त्रुटींमुळे एका साडेतीन वर्षांच्या निष्पाप बालकाला आपला जीव गमवावा लागल्याची धक्कादायक आणि संतापजनक घटना घडली आहे. या प्रकरणी इगतपुरी पोलीस ठाण्यात रिसॉर्टचे मालक सुमित कृपलानी, बुकिंग मॅनेजर सौरभ कांबळे आणि रिसॉर्ट मॅनेजर पराग त्रिवेदी यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ च्या कलम १०५ व ३(५) अन्वये सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गेटुगेदरचा आनंद क्षणात ओसरला; शोककळा पसरली

छत्रपती संभाजीनगर येथील पोलीस अंमलदार व अधिकाऱ्यांच्या २००६ च्या बॅचचा गेटटुगेदर कार्यक्रम २६ जुलै ते २७ जुलै २०२६ दरम्यान इगतपुरी येथील मानस लाईफस्टाईल रिसॉर्ट येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी जवळपास ४० ते ४५ कुटुंबे (सुमारे १५५ ते १६० सदस्य) एकत्र आले होते.

फिर्यादी पोलीस अंमलदार रवींद्र सुभाष देशमुख (वय ३९, रा. दक्षता नगर, पडगाव, छत्रपती संभाजीनगर) हे आपल्या कुटुंबासह या गेटटुगेदरसाठी आले होते. २६ जुलै रोजी सायंकाळी ७.२६ ते ७.३६ वाजेच्या दरम्यान, त्यांचा साडेतीन वर्षांचा मुलगा अगस्त्य हा खेळता खेळता नजरेचा पडाव चुकून स्विमिंग पूलकडे गेला. स्विमिंग पूलमध्ये पडलेला बॉल काढण्याचा प्रयत्न करत असतानाच त्याचा पाय घसरला आणि तो पाण्यात पडला.

### लाईफगार्ड अन् सुरक्षा रक्षक गायब; उपचारापूर्वीच मृत्यू

**काही वेळाने सहकाऱ्यांनी स्विमिंग पूलमध्ये बाळ पडल्याचे पाहून आरडाओरडा केला आणि त्याला तात्काळ पाण्यातून बाहेर काढून 'सीपीआर' (CPR) देण्यात आला. त्यानंतर त्याला तातडीने घोटी येथील लहान मुलांच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले. या घटनेने हसत्या-खेळत्या गेटटुगेदरवर आणि देशमुख कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.**

### रिसॉर्ट प्रशासनाचा निष्काळजीपणा उघड

**बुकिंगच्या वेळी रिसॉर्ट मालक आणि व्यवस्थापनाने सुरक्षेच्या सर्व उपाययोजना, लाईफगार्ड, सुरक्षारक्षक आणि बॅरिकेटिंगची पूर्ण खबरदारी घेतली जाईल, असे आश्वासन दिले होते. मात्र, प्रत्यक्ष घटनेच्या वेळी.**

- **स्विमिंग पूलजवळ एकही सुरक्षा रक्षक किंवा लाईफगार्ड तैनात नव्हता.**
- **लहान मुलांच्या सुरक्षेसाठी कोणतीही बॅरिकेटिंग किंवा सुरक्षा व्यवस्था करण्यात आलेली नव्हती.**
- **शासकीय नियमांचे उल्लंघन करून रिसॉर्ट प्रशासनाने पर्यटकांच्या जिवाशी खेळ मांडल्याचे निष्पन्न झाले आहे.**

**पोलीस कारवाई आणि पुढील तपास :**

याप्रकरणी रवींद्र देशमुख यांनी २९ जुलै २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून इगतपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक (PSI) कांचन पांडुरंग भोजने करत आहेत. निष्पाप बालकाच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या रिसॉर्ट मालकावर आणि व्यवस्थापनावर कडक कारवाई करण्याची मागणी पर्यटकांकडून आणि नागरिकांकडून होत आहे.

## थोडक्यात वार्ता

### एक नाही, दोन नाही तर तब्बल ७००० विद्यार्थी HIV बाधित

**बंगळुरू :** कर्नाटकातील १८ ते २५ वयोगटातील ७,००० हून अधिक तरुण आणि विद्यार्थी एचआयव्ही बाधित आढळल्याची चिंताजनक माहिती समोर आली आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत कर्नाटक सरकारने आता सर्व अभियांत्रिकी आणि पदवी महाविद्यालयांमध्ये एचआयव्ही तपासणी तसेच समुपदेशन शिबिरे आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. ही शिबिरे सर्व सरकारी, अनुदानित आणि खाजगी महाविद्यालयांमध्ये घेतली जातील. परंतु, कोणत्याही विद्यार्थ्याची तपासणी त्याच्या संमतीशिवाय केली जाणार नाही, असे सरकारने स्पष्ट केले आहे. कर्नाटक राज्य एड्स प्रतिबंधक सोसायटीच्या शिफारशीनुसार उच्च शिक्षण विभाग आणि तंत्रज्ञान विद्यापीठाने महाविद्यालयांमध्ये एकात्मिक आरोग्य शिबिरे सुरू केली आहेत. नॅशनल एड्स कंट्रोल ऑर्गनायझेशनच्या अहवालानुसार भारतात एचआयव्ही बाधितांच्या संख्येत कर्नाटक तिसऱ्या क्रमांकावर आहे. कर्नाटकात सध्या सुमारे २.६० लाख लोक एचआयव्हीसह जगत आहेत. मात्र त्यापैकी २.०५ लाख लोकच उपचार घेत आहेत. म्हणजेच ५४ हजार लोकांना आपल्याला संसर्ग झाल्याची माहितीच नाही.

### शाळांच्या परिसरात जंक फूडच्या विक्रीवर बंदी; प्रशासनाचे निर्देश

**मुंबई :** राज्यातील शालेय विद्यार्थ्यांचे आरोग्य जपण्यासाठी आणि त्यांना लहान वयातच लठ्ठपणा तसेच विविध आजारांपासून दूर ठेवण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) कठोर नियमावली आणली आहे. राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय आणि खासगी शाळांच्या ५० मीटर परिघात उच्च चरबीयुक्त, जास्त मिठाचे आणि अतिरिक्त साखर असलेल्या 'जंक फूड'च्या विक्रीवर पूर्णपणे बंदी घालण्याचा निर्णय अन्न व औषध प्रशासनाने घेतला आहे. नवीन नियमावलीनुसार, शाळेच्या ५० मीटरच्या परिघात कार्यरत असलेली दुकाने, लहान-मोठे स्टॉल्स आणि खाद्यपदार्थ पुरवठादारांना 'भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाचे' (एफएसएसएआय) सर्व नियम पाळणे आता अनिवार्य असणार आहे. या परिघात अतिरिक्त फॅट्स, जास्त साखर आणि सोडियमचे प्रमाण असलेल्या प्रक्रियायुक्त खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कायद्याचा बडगा उगारला जाणार आहे. शालेय वयातच विद्यार्थ्यांना सकस आणि संतुलित आहाराची सवय लागावी, हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे.

### आषाढी वारीनिमित्त आभा कला मंचची पांडुरंगचरणी सेवा अर्पण

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** येथील आभा कला मंच या संस्थेद्वारे आषाढी वारीनिमित्त ८ ते २७ जुलै दरम्यान पुणे ते पंढरपूरपर्यंत महाराष्ट्र रोजगार हमी योजना अंतर्गत व्ही. व्ही. रामजी म्हणजेच विकसित भारत रोजगार व अजिविका हमी अभियान ग्रामीण या विषयावर विविध ठिकाणी ९० हून अधिक ठिकाणी पथनाट्याचे प्रयोग सादर करण्यात आले. या पथनाट्यास वारकरी बंधू-भगिनींकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. ह्या वारीत अनेक कलापथक, पथनाट्य लोककलावंत सहभागी झाले होते. सर्व कलासंचांनी लोकरंजनातून लोकप्रबोधन करून आपली सेवा पांडुरंगचरणी अर्पण केली. आभा कला मंचच्या या पथनाट्यास राज्याचे रोजगार हमी तथा फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले आवर्जून उपस्थित राहिले व त्यांनी या पथनाट्य सादर करणाऱ्या कलासंचाची मुक्तकंठाने प्रशंसा केली. यात आभा कला मंचचे अध्यक्ष मदन मिमरोट, के. एस. नवतुरे, अर्जुन घुसळे, नाना वाघ, वाल्मिक लाड, रेखा शेगावकर आदी कलावंतांचा सहभाग होता.




# दीड कोटींच्या जमिनीवर डोळा

## वाळूजमध्ये राजकारण्यांचे अभय असलेल्या भूमाफियांनी चालवला चोऱ्यामाऱ्यांचा धंदा!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहराला लागून असलेल्या वाळूज पोलीस ठाण्याच्या हद्दीत भूमाफियांनी अक्षरशः थैमान घातले असून, तब्बल दीड कोटी रुपयांची ९३ गुंठे जमीन बळकावण्याचा अत्यंत गंभीर आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे. मूळ मालकाला अंधारात ठेवून, त्याच्या मालकी हक्काचा बोर्ड तोडायचा, तार कंपाऊंड उखडून टाकायचे आणि बोगस दस्तऐवजांच्या जोरावर हक्काची जमीन लाटायची, असा हा भयंकर गोरखधंदा राजकारणाशी संबंध असणाऱ्यांच्या आशीर्वादाने सुरू असल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे.

याप्रकरणी वाळूज पोलीस ठाण्यात राजकारणाशी संबंधित व्यक्तीसह तब्बल ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, सर्वसामान्यांच्या जमिनींवर डल्ला मारणाऱ्या या टोळीची मस्ती आता चांगलीच टोकाला पोहोचली आहे.तक्रारदार राजकुमार अल्गर स्वामी यांचे कुटुंब गेल्या ५० वर्षांहून अधिक काळ छत्रपती संभाजीनगरमध्ये वास्तव्यास आहे. त्यांनी सन २००७ मध्ये गुरुधानोरा शिवारातील गट नं. ८४ मधील ५ एकर २५ गुंठे जमीन कायदेशीररित्या विकत घेतली होती. जमिनीवर सिमेंट पोलचे पक्के तार कंपाऊंड करून स्वतःच्या मालकीचा बोर्डही लावला होता. सातबाऱ्यावर कायदेशीर नाव असताना आणि बटाईने कसण्यासाठी जमीन दिलेली असताना, या मुजोर भूमाफियांनी थेट जमिनीवर डल्ला मारण्याचा कुटील डाव रचला.

२६ फेब्रुवारी रोजी जेव्हा बटाईदाराने फोन करून माहिती दिली, तेव्हा मालक घटनास्थळी धावून गेले. तिथे शिरजोरी करत आलेल्या गुंडांनी "आम्हाला फिरोज पठाण यांनी काम दिले आहे, तुला काय करायचे ते कर!" अशी अरेरावीची भाषा करत थेट दमदाटी केली. पडताळणी केली असता धक्कादायक बाबी समोर आल्या. हरिचंद्र फकीरराव चक्रनारायण, शांताबाई चक्रनारायण व नंदू चक्रनारायण यांच्याशी हातमिळवणी करून शरद भाऊसाहेब पवार आणि ज्ञानेश्वर जगन्नाथ मोगल यांनी कागदावर खरेदी खतांचा घोळ घातला. पुढे ही संपूर्ण ९३ गुंठे जमीन राजकारणाशी संबंधित फिरोज खाँ नबी खाँ पठाण याच्या घशात घालण्याचा कट रचण्यात आला.

मूळ मालकांचे तार कंपाऊंड तोडायचे, मालकी हक्काचा फलक फाडून फेकून द्यायचा आणि राजकीय वरदहस्ताच्या बळावर दुसऱ्याच्या घाम गाळून कमावलेली संपत्ती बळकावायची, हाच या टोळीचा एकमेव उद्योग बनला आहे. फिरोज पठाण याने अशाच प्रकारे इतरही अनेक सर्वसामान्य लोकांची फसवणूक केल्याची चर्चा परिसरात जोरात सुरू आहे.

# धनश्री पठाडे हिचे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये प्रभावी प्रतिनिधीत्व

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी :** मराठवाड्याची कन्या धनश्री शेषराव पठाडे हिने नुकतेच स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे झालेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या मुख्यालयातील ग्लोबल शेपर्स अॅन्युअल समिट-२०२६ मध्ये पुणे हबचे प्रभावी प्रतिनिधीत्व करत जागतिक व्यासपीठावर कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे.

'सिग्नल्स फॉर फ्युचर' या मुख्य संकल्पनेवर आधारित या आंतरराष्ट्रीय परिषदेत जगभरातील १२० हून अधिक देशांतील सुमारे ४५० युवा नेते सहभागी झाले होते. स्थानिक समस्यांवर युवकांच्या माध्यमातून शाश्वत उपाय शोधणे आणि जागतिक स्तरावर सकारात्मक बदल घडवणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश होता. ग्लोबल शेपर्स कम्युनिटी ही वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचा एक भाग आहे.

विविध सत्रांत सहभाग

छत्रपती संभाजीनगरची धनश्री पठाडे सध्या ग्लोबल शेपर्स कम्युनिटी, पुणे हबच्या क्युरेटर म्हणून कार्यरत आहेत. या परिषदेदरम्यान तिने एआय, शाश्वत विकास, मानसिक व महिला आरोग्य, युवक रोजगार, प्लास्टिक प्रदूषण, डिजिटल सुरक्षितता आणि लॉन्जेव्हिटी इकॉनॉमी या विषयांवरील सत्रांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आहे.

### स्थानिक तरुणांनी पुढाकार घ्यावा




**मराठवाड्याच्या मातीतून सुरू झालेला प्रवास जागतिक व्यासपीठापर्यंत पोहोचू शकतो, हा विश्वास देणारा हा अनुभव आहे. येथील दुष्काळ, पाणीटंचाई, शिक्षण व रोजगाराच्या प्रश्नांवर काम करण्यासाठी स्थानिक तरुणांनी पुढे येणे आवश्यक आहे. ग्लोबल शेपर्ससारखी व्यासपीठे त्यांना नक्कीच जागतिक मार्गदर्शन करून संधी मिळवून देतील.**

**- धनश्री पठाडे**

# राहत्या घरात गळफास घेऊन 40 वर्षीय व्यक्तीची आत्महत्या; कुटुंबावर शोककळा

**कन्नड :** दि.२९ जुलै - तालुक्यातील हिवरखेडा (गौ.) येथे राहत्या घरात दोरीच्या साहाय्याने गळफास घेऊन ४० वर्षीय व्यक्तीने आत्महत्या केल्याची घटना बुधवारी (दि. २९) सकाळी उघडकीस आली. बापूसाहेब दादासाहेब दाभाडे (वय ४०, रा. हिवरखेडा गौ. ता. कन्नड) असे मृताचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी सकाळी बापूसाहेब दाभाडे यांनी राहत्या घरात दोरीच्या साहाय्याने गळफास घेतला. त्यानंतर त्यांना उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय, कन्नड येथे दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. प्राथमिक माहितीनुसार, गळफास घेतल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची नोंद करण्यात आली आहे.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. याप्रकरणी कन्नड शहर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश दिंडे यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार त्रिलोकचंद पवार पुढील तपास करीत आहेत. बापूसाहेब दाभाडे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, आई-वडील असा परिवार आहे. त्यांच्या अकाली निधनामुळे हिवरखेडा गौ. परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# शासकीय कार्यालयात रील आणि व्हिडिओ बनवणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा; जिल्हाधिकाऱ्यांचे कडक निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालयांमधील काही अधिकारी व कर्मचारी केवळ वैयक्तिक प्रसिद्धीकरिता Instagram, Face-book, YouTube व इतर सोशल मीडिया माध्यमांवर रील, शॉर्ट व्हिडिओ, व्लॉग आणि तत्सम सामग्री तयार करून प्रसारित करत असल्याचे निदर्शनास आले होते. या प्रकाराची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगरच्या सामान्य प्रशासन विभागाकडून याबाबतचे अधिकृत परिपत्रक जारी करण्यात आले आहे. अनेक प्रकरणांमध्ये शासकीय कार्यालये, शासकीय वाहने, शासकीय गणवेश, पदनाम, कार्यालयीन दालने, शासकीय अभिलेख, राजचिन्ह, राजमुद्रा आणि इतर शासकीय संसाधने दर्शनीय राहतील अशा पद्धतीने त्यांचा वापर करून डान्स, मनोरंजनात्मक व्हिडिओ, अभिनय इत्यादी प्रकारची सामग्री वैयक्तिक प्रसिद्धीकरिता तसेच सोशल मीडियावर लोकप्रियता व अनुयायी (Follow-ers) वाढविण्याकरिता प्रसिद्ध केली जात असल्याचे दिसून येत आहे. अशा कृतींमुळे शासन आणि संबंधित विभागांविषयी नागरिकांमध्ये चुकीचा संदेश जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर, संदर्भिय शासन परिपत्रकानुसार शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सोशल मीडिया वापराबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमण्यात आल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनांचा भंग करणाऱ्या शासकीय अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, 1979 तसेच अन्य संबंधित नियमांनुसार योग्य ती कारवाई करण्यात येणार आहे.ही कारवाई अपर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून (उपजिल्हाधिकारी सा.प्र. संगीता गोविंद राठोड यांच्या स्वाक्षरीने) स्पष्ट करण्यात आली असून, सर्व उपविभागीय दंडाधिकारी आणि तहसीलदारांना यासंदर्भात माहिती व योग्य अंमलबजावणीसाठी प्रतिलिपि पाठवण्यात आली आहे.

# सावंगी–पळशी–बकापूर तांडा रस्ता चिखलाच्या विळख्यात; शेतकऱ्यांसह विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात

## दरवर्षी पावसाळ्यात तीच दुरवस्था; आमदार अनुराधाताई चव्हाण यांनी तातडीने सिमेंट रस्ता करावा, ग्रामस्थांची मागणी

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर




**छत्रपती संभाजीनगर :** सावंगी ते पळशी आणि पळशी ते बकापूर तांडा या मार्गाची पावसामुळे अत्यंत बिकट अवस्था झाली असून संपूर्ण रस्ता चिखलमय झाला आहे. या मार्गावरून दररोज शेतकरी, विद्यार्थी, तांड्यावर राहणारे नागरिक आणि महिला जीव धोक्यात घालून प्रवास करत आहेत. रस्त्यावरील चिखल, खड्डे आणि घसरडा मार्ग यामुळे अनेकदा अपघाताची भीती निर्माण होत असून ग्रामस्थांना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत आहे. दरवर्षी हीच परिस्थिती निर्माण होत असतानाही कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

हा रस्ता परिसरातील शेतकऱ्यांसाठी जीवनवाहिनी मानला जातो. शेतीसाठी लागणारे बियाणे, खते, औषधे आणि इतर साहित्य याच मार्गाने आणले जाते. मात्र रस्त्याची दुरवस्था पाहून अनेक वाहनचालक या भागात जाण्यास नकार देतात किंवा नेहमीपेक्षा अधिक भाड्याची मागणी करतात. त्यामुळे आधीच नैसर्गिक संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांवर आर्थिक भारही वाढत आहे.

याच मार्गावरून तांड्यावर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दररोज शाळेत जावे लागते. पावसाळ्यात रस्ता पूर्णपणे चिखलाने भरल्याने पालकांना लहान मुलांना शाळेत सोडण्यासाठी आणि आणण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. दुचाकी घसरण्याची भीती कायम असल्याने प्रत्येक प्रवास धोकादायक ठरत आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, अनेक वर्षांपासून या रस्त्याची अवस्था बदललेली नाही. प्रत्येक पावसाळ्यात चिखल, खड्डे आणि वाहतुकीचा खोळंबा हीच परिस्थिती निर्माण होते. संबंधित विभागाकडे वारंवार पाठपुरावा करूनही कायमस्वरूपी काम झाले नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

स्थानिक नागरिकांनी आमदार अनुराधाताई चव्हाण यांनी या प्रश्नात तातडीने हस्तक्षेप करून सावंगी–पळशी–बकापूर तांडा या मार्गाचे सिमेंटीकरण करावे, अशी जोरदार मागणी केली आहे. शेतकरी, विद्यार्थी आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेला हा प्रश्न प्राधान्याने सोडविण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.




**" शे ती सा ठी लागणारे साहित्य आणण्यासाठी वाहनचालक जादा भाडे घेतात. आमचा तांडा याच रस्त्यावर असल्याने दुसरा पर्याय नाही. रोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. आमदार अनुराधाताई चव्हाण यांनी तातडीने सिमेंट रस्ता करून द्यावा."**

**- रामभाऊ म्हस्के (शेतकरी)**



**"माझी लहान मुले दररोज या चिखलातून शाळेत जातात. वाहन घसरले तर मोठा अपघात होऊ शकतो. दरवर्षी अशीच परिस्थिती निर्माण होते. आमच्या मुलांच्या सुरक्षिततेसाठी हा रस्ता लवकर पूर्ण करावा."**

**- चंद्रकांत म्हस्के (विद्यार्थ्यांचे पालक)**



**"मी लहानपणापासून हा रस्ता अशाच अवस्थेत पाहत आहे. पाऊस पडला की संपूर्ण रस्ता चिखलाने भरतो. नागरिकांचा प्रवास अत्यंत कठीण होतो. हा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी सिमेंट रस्ता करणे आवश्यक आहे."**

**- इजाज शेख (गॅरेज चालक)**

# संपादकीय

## राजकारणातील अब्जाधीश, प्रलंबित गुन्हे आणि लोकशाहीपुढील आव्हाने

'एसोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स' (ADR) या स्वयंसेवी संस्थेने देशातील ३१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्यमंत्र्यांच्या आर्थिक व कायदेशीर पार्श्वभूमीबाबत प्रसिद्ध केलेला ताजा अहवाल भारतीय लोकशाहीचे एक अतिशय चिंताजनक आणि अंतर्मुख करायला लावणारे चित्र समोर आणतो. लोकशाही व्यवस्थेत लोकप्रतिनिधी हे सर्वसामान्य जनतेचे प्रतिनिधित्व करतात असा संकेत असतो; परंतु या अहवालानुसार देशातील ३१ मुख्यमंत्र्यांची एकूण एकत्रित संपत्ती तब्बल ३,६६० कोटी रुपयांच्या घरात पोहोचली आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार १,४१३ कोटी रुपयांच्या मालमत्तेसह देशातील सर्वात श्रीमंत मुख्यमंत्री ठरले आहेत, तर आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू (९३१ कोटी) आणि तमिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय (६४८ कोटी) हे अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर आहेत. दुसरीकडे, जम्मू-कश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला ५५ लाख रुपये आणि पश्चिम बंगालचे सुवेंदू अधिकारी ८५ लाख रुपयांच्या संपत्तीसह सर्वात कमी मालमत्ता असलेल्या मुख्यमंत्र्यांच्या यादीत आहेत. संपत्तीतील ही अथांग दरी आणि राजकारणाचे वाढते 'अब्जाधीशकरण' (Plutocracy) हे सर्वसामान्य नागरिकांच्या सहभागावर आणि समान संधीच्या तत्त्वावर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित करते. मात्र, संपत्तीच्या या आकड्यांपेक्षाही अधिक धक्कादायक आणि गंभीर बाब म्हणजे लोकप्रतिनिधींवरील वाढती गुन्हेगारी प्रकरणांची संख्या होय. अहवालानुसार, ३१ पैकी तब्बल १४ मुख्यमंत्र्यांनी (जवळपास ४५ टक्के) स्वतःवर विविध गुन्हे दाखल असल्याचे निवडणूक प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे. यामध्ये ११ मुख्यमंत्र्यांवर हत्येचा प्रयत्न, भ्रष्टाचार आणि लाचखोरी यांसारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे नोंदवलेले आहेत. तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्यावर सर्वाधिक ८९ गुन्हे दाखल असून सुवेंदू अधिकारी (२९ गुन्हे), डी. के. शिवकुमार (१९ गुन्हे) आणि चंद्राबाबू नायडू (१९ गुन्हे) हेही या यादीत आघाडीवर आहेत. देशाचे सर्वोच्च कार्यकारी पद भूषवणाऱ्या आणि संपूर्ण राज्याचा कारभार हाकणाऱ्या नेत्यांवर अशा प्रकारे गंभीर गुन्हे प्रलंबित असणे, हे कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने अजिबात भूषणावह नाही. राजकारणातील वाढता पैसा आणि गुन्हेगारीचा प्रभाव हा भारतीय लोकशाहीला लागलेला एक जुना कर्करोग आहे. जेव्हा निवडणुका लढवणे ही केवळ कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक बनते, तेव्हा निष्ठावंत, अभ्यासू आणि तळागाळातील प्रामाणिक कार्यकर्त्यांना राजकारणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर जावे लागते. तसेच, राजकीय सूडबुद्धीने दाखल केलेले गुन्हे आणि प्रत्यक्ष गुन्हेगारी पार्श्वभूमी यातील फरक जरी कायद्याने सिद्ध व्हायचा असला, तरी गंभीर गुन्ह्यांचे आरोप असलेल्या व्यक्ती उच्च पदांवर विराजमान राहिल्याने तपास यंत्रणांवर आणि न्यायव्यवस्थेवर अप्रत्यक्ष दबाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. एडीआरचा हा अहवाल केवळ आकडेवारी मांडणारा दस्तावेज नसून, तो देशातील निवडणूक सुधारणांच्या तातडीच्या गरजेची जाणीव करून देणारा अलार्म आहे. संसदेने आणि सर्वोच्च न्यायालयाने राजकारणाचे गुन्हेगारीकरण रोखण्यासाठी, जलदगती न्यायालयांद्वारे लोकप्रतिनिधींवरील खटले तातडीने निकाली काढण्यासाठी आणि निवडणूक खर्चावर पारदर्शक नियंत्रण आणण्यासाठी अधिक कठोर पावले उचलणे ही काळाची गरज आहे. जोपर्यंत सामान्य नागरिक केवळ संपत्ती आणि प्रभावाच्या आधारे नव्हे, तर चारित्र्य आणि कर्तृत्वाच्या आधारे मतदान करणार नाहीत, तोपर्यंत लोकशाहीचे खरे अधिष्ठान बळकट होणार नाही.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक सभागृह माणगाव येथे वर्षावास मालिकेचा प्रारंभ संपन्न




**बोरघर, माणगांव रायगड :** बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा माणगाव आणि शाखा क्रमांक एक आयोजित वर्षावास धम्म प्रवचन मालिकेच्या प्रारंभ अर्थात पहिला दिवस या दिवशी तिसऱ्या पर्वाच्या वर्षावास धम्म प्रवचन मालिका सोहळ्याची सुरुवात डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक सभागृह माणगाव येथे बुधवार दिनांक २९ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा माणगाव चे विद्यमान अध्यक्ष मा. रविंद्र मोरे यांच्या अध्यक्षतेखाली उपाध्यक्ष मा. नामदेव राव, सचिव मा. रघुनाथ साळवी, सह सचिव मा. रणजित मोहिते, कोषाध्यक्ष मा. सुरेंद्र जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि तालुक्यातील सर्व उपविभागीय एक ते अकरा शाखांचे आजी माजी पदाधिकारी, सभासद, धम्म उपासक, धम्म उपासिका यांच्या मोठ्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक सभागृह माणगाव येथे मोठ्या उत्साहात आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाला.

सदर मंगलमय सोहळ्याला बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा माणगाव चे सर्व पदाधिकारी शाखा क्रमांक १) चे अध्यक्ष प्रशांत गायकवाड, उपाध्यक्ष दयाराम साळवी, सचिव विनोद मोरे, सह सचिव प्रकाश मोरे, शाखा क्रमांक २) निजामपूर विभाग अध्यक्ष रवींद्र गायकवाड, शाखा क्रमांक ३) कडापे विभाग अध्यक्ष सुनील उभारे, शाखा क्रमांक ४) इंदापूर विभाग माजी उपाध्यक्ष प्रकाश कांसे, शाखा क्रमांक ५) खरवली विभाग अध्यक्ष विवेक जाधव, उपाध्यक्ष राजेश कासारे, सह सचिव नंदू कांबळे,ऑडिटर संतोष मोरे, शाखा क्रमांक ६) माणगाव शहर शाखा अध्यक्ष निलेश साळवी, उपाध्यक्ष महेंद्र पवार, माजी सचिव रमेश लोखंडे, शाखा क्रमांक ७) साई विभाग अध्यक्ष संदेश जाधव, सह सचिव मंगेश मोरे , शाखा क्रमांक ८) मोर्बा विभाग अध्यक्ष संदेश साळवी, प्रदीप हाटे,भाऊ ओव्हाळ, निलेश साळवी, शाखा क्रमांक ९) गोवेले विभाग अध्यक्ष धनवेश साळवी, रमेश शिंदे , मनोहर शिंदे, संदेश शिंदे, अरुण मोरे, शाखा क्रमांक १०) वडवली विभाग सह खजिनदार संजय जाधव, उपाध्यक्ष यशवंत शिर्के, सचिव सिद्धार्थ मोरे, बामसेफ आणि बीन चे प्रवक्ते सुर्यकांत कासे सर,आणि माणगाव तालुका शाखेच्या सर्व उप विभागीय शाखांचे सर्व आजी माजी सन्माननीय पदाधिकारी आणि सर्व सन्माननीय सभासद आबालवृद्ध धम्म बांधव, भगिनी शुभ्र वस्त्र परिधान करून मोठ्या संख्येने उपस्थित राहिले होते. या कार्यक्रमासाठी सत्कारमूर्ती माजी तालुका सचिव मा. पराग जाधव यांनी भोजन दान दिले. भोजनानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

या मंगलमय वर्षावास धम्म प्रवचन मालिका सोहळ्याचे उदघाटण मा. पराग जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. या शानदार वर्षावास धम्म प्रवचन सोहळ्याची सुरुवात प्रांगणात बोधी वृक्ष रोपण करून त्या नंतर मान्यवरांच्या हस्ते आदर्शांच्या प्रतिमांना पुष्प आणि पुष्प माला अर्पण करून अगरबत्ती, मेणबत्ती प्रज्वलित करून. बुद्ध वंदना, त्रिशरण आणि पंचशीलाचे सामूहिक पठण करून करण्यात आली.

सदर वर्षावास धम्म प्रवचन मालिका सोहळ्याचे सूत्रसंचालन बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा माणगाव चे विद्यमान सचिव मा. रघुनाथ जी साळवी यांनी केले. आणि या शानदार सोहळ्याचे सुनियोन आणि व्यवस्थापन बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा माणगाव चे विद्यमान दुय्यम सचिव मा. रणजित मोहिते आणि कोषाध्यक्ष मा. सुरेंद्र जाधव आणि शाखा क्रमांक एक चे अध्यक्ष मा. प्रशांत गायकवाड आणि त्यांचे सहकारी यांनी केले. सदर सोहळा तालुका शाखा आणि शाखा क्रमांक एक च्या यजमान नेतृत्वाखाली संपन्न झाला.

या मंगलमय वर्षावास धम्म प्रवचन मालिका सोहळ्याचे संपूर्ण चित्रीकरण, प्रचार प्रसार आणि सर्वदूर प्रसिद्धी देण्याचं काम पत्रकार उत्तम तांबे, पत्रकार गौतम जाधव आणि पत्रकार विश्वास गायकवाड तालुका प्रसिद्धी प्रमुख म्हणून प्रिंट मिडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया आणि सोशल मीडियाच्या

## गुर्वष्टकम्

{ शरीरं सुरूपं तथा वा कलत्रं
यशश्चारु चित्रं धनं मेरुतुल्यम्।
मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे
**ततः किं ततः** किं ततः किं ततः किम्।।1 }

मिळालीच काया जरी सुस्वरूपी
असे रम्य भार्या च लावण्यखाणी।
उभ्या भव्य याच्या यशाच्या कमानी
असे रास मेरूपरी दौलतीची।।
गुरूपादपद्मी परी चित्त नाही ।
तरी साधले साधले काय त्यानी।।1

{ कलत्रं धनं पुत्रपौत्रादि सर्वं
गृहं बान्धवाः सर्वमेतद्धि जातम्।
मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे
**ततः किं ततः** किं ततः किं ततः किम्।।2 }

असे कामिनी संतती संपदा ही
मुले नात नातू सुना सर्व काही।
जरी भव्य प्रासाद आरामदायी
पुढे मागुती घालिती आप्त रुंजी
गुरूपादपद्मी परी चित्त नाही। तरी साधले साधले काय त्यानी।।2

{ षडङ्गादिवेदो मुखे शास्त्रविद्या
कवित्वादि गद्यं सुपद्यं करोति
मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे
**ततः किं ततः** किं ततः किं ततः किम्।।3}

जिभेच्याच टोकावरी वेदविद्या
जरी राहती सर्व शास्त्रे समग्रा
अलंकार युक्ता करी काव्यमाला
दिसे गद्य-शैलीमधेही महत्ता
गुरूपादपद्मी परी चित्त नाही । तरी साधले साधले काय त्यानी।।3

**{ विदेशेषु मान्यः स्वदेशेषु धन्यः**
सदाचारवृत्तेषु मत्तो न चान्यः
मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे
**ततः किं ततः** किं ततः किं ततः किम्।।4 }

मिळे मान-सन्मान त्यासी विदेशी
सदा वाजतो कीर्ति-डंका स्वदेशी।
सदाचारमूर्ती मला मानताती
अहंता सुखावे अशी ज्या मनासी
गुरूपादपद्मी परी चित्त नाही । तरी साधले साधले काय त्यानी।।4

{ क्षमामण्डले भूपभूपालवृन्दैः
सदासेवितं यस्य पादारविन्दम्।
मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे
**ततः किं ततः** किं ततः किं ततः किम्।।5 }

जगा जिंकुनी सर्व पृथ्वीतळाचा
जरी जाहला थोर सम्राट मोठा
जरी होऊनी दास राजेच सारे
सदा सेवती पाउले वंद्य भावे
गुरूपादपद्मी परी चित्त नाही । तरी साधले साधले काय त्यानी।।5

**- प्रविण दिक्षित**
**माजी पोलीस महासंचालक**
**महाराष्ट्र राज्य**

## जिंतूर तालुक्यातील सिंचन प्रश्न सोडवीण्यासाठी पी.डी.एन. प्रकल्पाचे काम प्राधान्याने करावे -राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांचे निर्देश

### येलदरी धरणातून पाणीपुरवठ्याबाबत मुंबईत आढावा बैठक संपन्न

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** येलदरी धरणाच्या उद्भवातून जिंतूर तालुक्याकरिता बंद पाईपलाईनद्वारे (पी.डी.एन.) सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्याबाबत शासन सकारात्मक आहे. हा प्रकल्प पूर्णत्वास गेल्यास परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्याअनुषंगाने सर्व यंत्रणांनी समन्वयाने आणि गतीने काम करून हा प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावावा, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास आणि सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी आज दिले.

राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबई येथील निर्मल भवन येथे एमएसआरडीसी कार्यालयात याबाबत महत्त्वाची बैठक पार पडली. येलदरी धरणाच्या उद्भवातून जिंतूर तालुक्याकरिता बंद पाईपलाईनद्वारे (पी.डी.एन.) सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्याबाबत या बैठकीत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सविस्तर चर्चा करण्यात आली. दूरदृश्यप्रणाली द्वारे या बैठकीस परभणीचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत संबंधित विभाग प्रमुखांनी प्रकल्पाच्या सद्यस्थितीचे व प्रगतीचे सादरीकरण केले. जिंतूर तालुक्यातील अवर्षणप्रवण तसेच सिंचनाच्या अल्प सोयी असलेल्या भागातील शेतकऱ्यांची बंद पाईपलाईनद्वारे (पी.डी.एन.) सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी अनेक वर्षांपासूनची आहे. येलदरी धरणातून उपसा करून जिंतूर तालुक्यातील केहाळ, सावंगी म्हाळसा, हिवरखेडा, चारठाणा, भोसी यांसारख्या अनेक गावांना सिंचनाचा लाभ मिळणे महत्वाचे आहे. त्याअनुषंगाने व्यापक जनहिताचा हा प्रश्न सोडवीण्यासाठी आवश्यक उपाययोजना प्राधान्याने करण्याचे निर्देश राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर यांनी दिले.

राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर यावेळी म्हणाल्या, जिंतूर तालुक्यातील सिंचन प्रश्न सोडविणे ही शासनाची प्राथमिकता आहे. बदलती पीक पद्धती, या पिकांना सिंचनासाठी आवश्यक पाणी पुरवठा आणि संबंधित सर्व मुद्द्यांचा अभ्यास प्राधान्याने करावा. व्यापक शेतकरी हित डोळ्यासमोर ठेवून योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून पुढील कार्यवाही वेळेत पूर्ण करावी, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

## अजिंठा टि पॉंइंट वळणावर दोन ट्रकाचा अपघात



**फर्दापूर :** छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर अजिंठा लेणी टि पॉंइंट वळणावर दोन ट्रकाचा समोरासमोर अपघात मंगळवारी संध्याकाळी साडेपाच वाजता दोन ट्रकाचा अजिंठा लेणी टि पॉंइंट वळणावर दोन ट्रकाचा समोरासमोर अपघात झाला असून यातील आयशर ट्रक एम एच 19 सी एक्स 0773 तोंडापूर हुन लाकडी गट्टू घेऊन छत्रपती संभाजीनगर कडे जात होता तर दुसरा कंटेनर आर जे 23 जी सी 7714 तामिळनाडू हुन कापड राजस्थान घेऊन जात असताना हा अपघात झाला असून यातील दोन्ही गाड्या चे चालक किल्नर किरकोळ जखमी आहेत याठिकाणी फर्दापूर पोलीस स्टेशनचे सहा पोलीस निरीक्षक सुधीर मोटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी आकाश गवळे, ठाकरे, होमगार्ड शिवाजी रोकडे,किरण सपकाळ यांनी घटनास्थळी जाऊन याठिकाणी ट्राफिक जाम होणार नाही याची काळजी घेतली कारण अजिंठा घाटातील फर्दापूर कडे येणारा सर्वात मोठा वळण घेणारा रस्ता असल्याने येथे पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते या अपघात ठिकाणी या दोन्ही ट्रक रस्त्यावर असल्याने येथे एकेरी वाहतूक सुरळीत करण्यात आली होती या अपघाताचे असे आहे की चालक यांनी सांगितले की या वळणावर रस्त्यावर खड्डे पडले आहेत या दोन्ही गाड्या चे चालक खड्डे वाचताना या दोन्ही गाड्या एकमेकांवर धडकल्यामुळे अपघात झाला असे सांगण्यात आले आहे तसेच अजिंठा घाटात बऱ्याच ठिकाणी मोठ मोठे खड्डे पडले असून हे खड्डे पावसाने अजून मोठे होतात त्यामुळे अजिंठा घाटात बांधकाम विभाग यांनी खड्डे डाबरानी बुजविण्याचे यावे असे चालक यांची मागणी करण्यात येत आहे.

## एमजीएमच्या डॉ. प्राप्ती देशमुख व प्रा. वैशाली कुंभकर्ण यांच्या संशोधनास डिझाईन पेटंट



**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या डॉ.जी.वाय.पाथ्रीकर कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीच्या प्राचार्या डॉ.प्राप्ती देशमुख आणि सहाय्यक प्राध्यापिका प्रा.वैशाली कुंभकर्ण यांच्या 'डायग्नॉस्टिक कॉम्प्लायन्स मॉनिटरिंग' या विषयावरील नाविन्यपूर्ण संकल्पनेस भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून डिझाईन पेटंट प्रदान करण्यात आले आहे. संशोधन व नवोपक्रमाच्या क्षेत्रातील ही उल्लेखनीय कामगिरी मानली जात असून विद्यापीठाच्या संशोधन परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या संशोधनामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रा. सोनाली कुलकर्णी यांनीही मोलाचे योगदान दिले आहे. या डिझाईन पेटंटमुळे संशोधन क्षेत्रातील गुणवत्ता आणि बौद्धिक संपदा निर्मितीला चालना मिळणार असून भविष्यात आरोग्यसेवा क्षेत्रातील तांत्रिक संशोधन, निदान प्रक्रिया आणि अनुपालन व्यवस्थापन अधिक परिणामकारक व विश्वासार्ह करण्यासाठी या संकल्पनेचा उपयोग होणार आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल डॉ.प्राप्ती देशमुख आणि प्रा.वैशाली कुंभकर्ण यांचे विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर तसेच विद्यापीठातील सर्व मान्यवरांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील संशोधन वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## एलोरा इंग्लिश स्कूल अँड सायन्स ज्युनिअर कॉलेजमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी




हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** एलोरा इंग्लिश स्कूल अँड सायन्स ज्युनिअर कॉलेजमध्ये गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात व मातृ-पितृ पूजन करून साजरी करण्यात आली. प्रथम भगवान वेदव्यास व सरस्वती यांचे पूजन करण्यात आले.संस्थेचे सचिव प्रल्हाद शिंदे व शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता शिंदे ह्यांनी गुरूंचे व माता- पिता ह्यांचे महत्त्व विषद केले.इ 10वी च्या विद्यार्थ्यांनी महर्षी पाणिनी हे नाटुकले सादर केले.

यावेळी संस्थेतील शिक्षकांचा विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ व शुभेच्छा देऊन सन्मान केला. श्रुती चव्हाण, नेहा सुतवणे, कामाक्षी देशमुख व वेणू नाईक ह्या विद्यार्थ्यांनींनी गुरूंच्या कार्याचे महत्त्व सांगणारी भाषणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली. "गुरू हेच ज्ञानाचे खरे मार्गदर्शक असून विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देण्याचे कार्य गुरू करतात," असा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हरजितकौर सोधी, निलाक्षी राव, अश्विनी काळे, दत्तात्रय गवारे, सचिन काळे ह्यांनी परिश्रम घेतले.

## नशामुक्त युवा फॉर विकसित भारत अभियानांतर्गत जिल्हास्तरीय विविध स्पर्धा संपन्न



**परभणी, दि. 29 (जिमाका) :** युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या मेरा युवा भारत परभणीच्या वतीने नशामुक्त युवा फॉर विकसित भारत अभियानांतर्गत श्री शिवाजी महाविद्यालय, येथे जिल्हास्तरीय विविध स्पर्धा व जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापकवृंद, कर्मचारी, मेरा युवा भारतचे जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर, सहाय्यक विभाग अधिकारी गजानन गाडेकर, स्वयंसेवक दीपक खुळे, स्नेहा वाघमारे तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे आभार मानण्यात आले.

उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. रोहिदास नितोंडे होते. अमली पदार्थ विरोधी पथक, नांदेड विभागाचे श्री. कोरंटलू प्रमुख उपस्थित म्हणून लाभले. जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर यांनी अभियानाचा उद्देश स्पष्ट करत युवकांनी व्यसनमुक्त राहून विकसित भारताच्या निर्मितीत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थी, प्राध्यापक व मान्यवरांना नशामुक्तीची शपथ देण्यात आली. व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी स्वतः व्यसनापासून दूर राहणे तसेच इतरांनाही त्याबाबत जागरूक करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

यानंतर श्री. कोरंटलू यांनी व्यसनाधीनतेमुळे व्यक्ती, कुटुंब आणि समाजावर होणाऱ्या गंभीर दुष्परिणामांविषयी मार्गदर्शन केले. युवकांनी कोणत्याही प्रकारच्या अमली पदार्थांपासून दूर राहून निरोगी, जबाबदार आणि जागरूक नागरिक म्हणून जीवन जगावे, असे आवाहन त्यांनी केले.

अभियानांतर्गत चित्रकला, वक्तृत्व, घोषवाक्य लेखन, स्लॅम पोएट्री आणि रील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत व्यसनमुक्तीचा प्रभावी संदेश आपल्या सादरीकरणातून दिला. वक्तृत्व स्पर्धेतील विद्यार्थ्यांनी "नशा करायचीच असेल तर ती स्वप्नांची, मेहनतीची, यशाची आणि आई-वडिलांची स्वप्ने पूर्ण करण्याची असावी," असा प्रेरणादायी संदेश दिला.

स्पर्धांचे पर्यवेक्षक म्हणून प्रा. डॉ. एस. एल. राठोड, प्रा. सविता कोकाटे, प्रा. अंकुश खटिंग, प्रा. स्वाती देशमुख, प्रा. अतुल समिंद्रे, प्रा. अनिल बडगुजर आणि प्रा. राधिका सोळंके यांनी जबाबदारी पार पाडली.

स्पर्धांमध्ये चित्रकला स्पर्धेत सिध्दी देशमुख, वक्तृत्व स्पर्धेत अनुसया कुलथे, रील स्पर्धेत शर्वरी सांगळे, घोषवाक्य लेखन स्पर्धेत गीता गिरकर आणि स्लॅम पोएट्री स्पर्धेत निकिता आसोलकर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. विजेत्यांना प्रमाणपत्रे व पारितोषिके प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे यांनी केले. बक्षीस वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशट्टी होते.

## गिरीस्थान नगरपरिषद, खुलताबाद व मुक्ताई व्यसनमुक्ती व पुनर्वसन व्यसनमुक्त रॅली



**खुलताबाद प्रतिनिधी :** खुलताबाद गिरीस्थान नगरपरिषद व मानसिक आरोग्य केंद्र यांच्या संयुक्त विद्यमानाने मुख्य अधिकारी समीर शेख यांच्या मार्गदर्शन खाली व्यसनमुक्ती रॅली खुलताबाद शहरात काढण्यात आली रॅली च्या माध्यमातून व्यसनापासून दूर राहा असे आवाहन करण्यात आले यावेळी स्वच्छता निरीक्षक हरिहर चांदोडे, शहर समन्वयक गणेश रोटे, दरोगा लक्ष्मण तुपे, वसीम व सुपरवायझर सुरेश वाघ रॅलीमध्ये मध्ये हजर होते

## धार्मिक भावना दुखावल्या प्रकरणी गुन्हा

**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील शिवना येथे सोशल मीडियावरील स्टेटसवरून झालेल्या वादातून बौद्ध व मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी अजिंठा पोलीस ठाण्यात एका युवकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २६ जुलै रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजता शिवाई मेडिकल परिसरात घडली. याप्रकरणी सुनिल भिकन जगताप (रा. शिवना) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रुद्रा दादाराव सपकाळ (रा. शिवना) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम २९९, ३५१(२) व ३५२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीने इन्स्टाग्रामवर ठेवलेल्या स्टेटसवरून वाद निर्माण झाला. आरोपीने व्हॉईस रेकॉर्डिंगद्वारे शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मुस्लिम धर्माबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या तक्रारीच्या आधारे धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब भवर करीत आहेत.

## कार–मोटारसायकलच्या समोरासमोर धडकेत बिडकीन येथील दोन तरुणांचा मृत्यू

**बिडकीन, दि. २९ (प्रतिनिधी):** पैठण–छत्रपती संभाजीनगर महामार्ग क्र. ७५२ वरील रमानगरजवळ परिंदा हॉटेलसमोर कार आणि मोटारसायकलची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात दोन तरुणांचा मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवार (दि. २८) रोजी मध्यरात्री सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास जगद्गुरू रामानंदाचार्य संस्थान, नाणीज धामच्या रुग्णवाहिका चालकाला अपघाताची माहिती मिळाली. त्यानुसार रुग्णवाहिका तत्काळ घटनास्थळी दाखल झाली. कार (क्र. MH20 HT 6667) व मोटारसायकल (क्र. MH20 FN 7857) यांची समोरासमोर धडक झाल्याने मोटारसायकलवरील दोघे तरुण गंभीर जखमी झाले होते. जखमी प्रतीक संजय कांबळे (वय २०) व सौरभ म्हात्रे (वय २३, दोघेही रा. बिडकीन, ता. पैठण) यांना प्रथम बिडकीन घाटी मध्ये प्राथमिक उपचार देऊन पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती दोघांनाही मृत घोषित केले.या घटनेमुळे बिडकीन परिसरात शोककळा पसरली असून, बुधवारी दुपारी दोन्ही तरुणांवर अंत्यसंस्कार करण्यात आले. या अपघाताची नोंद बिडकीन पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज पाटील, सहायक फौजदार अशोक सोकटकर बीट जमादार आप्पासाहेब माळी करीत आहे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सोयगाव येथे दिव्यांग बांधवांसाठी महाआरोग्य शिबिर

**सावळदबारा प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सोयगाव येथे दिव्यांग बांधवांसाठी महाआरोग्य शिबिर भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांच्या वतीने सोयगाव येथील उप जिल्हा रुग्णालयात सोयगाव तालुक्यातील दिव्यांग बांधवांसाठी भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये सोयगाव तालुक्यातील सुमारे 2 हजार दिव्यांग बांधवांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. २०० दिव्यांग बांधवांना जागेवरच दिव्यांग प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कमालकर मुदखेडकर यांनी शिबिरास भेट देऊन पाहणी केली. हे शिबिर भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांनी आयोजित केले होते. यावेळी भाजपचे प्रदेश चिटणीस सुरेश बनकर उपस्थिती होती.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य पुष्पाताई काळे, जिल्हा परिषद सदस्य माहीन इद्रिस मुलतानी, तालुकाध्यक्ष संजय पाटील, जिल्हा चिटणीस सुनील गावंडे, भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते, सजीवन सोनवणे, वसंत बनकर, जयप्रकाश चव्हाण, सभापती उत्तम चव्हाण, फर्दापूर पंचायत समिती सदस्य राहुल राठोड,माजी उपनगराध्यक्ष योगेश पाटील, जयश्री पवार,गणेश लोखडे, मंगेश सोहणी, गजानन पवार, मयूर मनगटे, पंजाबराव कोलते, एकनाथ सपाटे, संजय चव्हाण, राजू दांडगे, स्वराज डापके, संभाजी पवार, प्रमोद पाटील , सिताराम जाधव, लवकेश जाधव, अनिल राठोड, मुकुंदा गायकवाड, लक्ष्मण पवार, आदी होते

## पात्र शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ मिळविण्यासाठी आवश्यक प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी - संजयसिंह चव्हाण

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** महाराष्ट्र शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–२०२६ अंतर्गत परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ देण्याची प्रक्रिया वेगाने सुरू असून, जिल्ह्यातील १,६०,७६९ शेतकऱ्यांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. त्यापैकी पहिल्या यादीत ७९,८५५ पात्र शेतकऱ्यांना सुमारे ५८२ कोटी रुपयांच्या कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. उर्वरित पात्र शेतकऱ्यांचा समावेश दुसऱ्या यादीत करण्यात येणार असून त्यांनाही योजनेचा लाभ दिला जाईल.

योजनेचा लाभ थेट लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्यासाठी आधार प्रमाणीकरण (Aadhaar Authentication) व ॲग्रीस्टॅक (AgriStack) नोंदणी अनिवार्य आहे. त्यामुळे सर्व पात्र शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह तातडीने ही प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

तसेच, शासनाच्या निर्णयानुसार वेळेत पीककर्जाची परतफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ₹५०,००० पर्यंत प्रोत्साहनपर रक्कम देण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी आपल्या बँकेशी संपर्क साधावा. जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयकृत, खासगी, ग्रामीण व सहकारी बँकांनी आपल्या खातेदार शेतकऱ्यांना योजनेबाबत तातडीने मार्गदर्शन करून आधार प्रमाणीकरण, ॲग्रीस्टॅक नोंदणी व आवश्यक माहिती अद्ययावत करण्यासाठी सहकार्य करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

# भारतीय मजदूर संघाचा 17 ऑगस्ट 2026 रोजी देशव्यापी जिल्हास्तरीय धरणे आंदोलनाचा निर्णय

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी





उरण / रायगड : भारतीय मजदूर संघाच्या अखिल भारतीय कार्यसमितीची बैठक दि. २६, २७ व २८ जुलै २०२६ रोजी सरला बिर्ला विद्यापीठ, रांची (झारखंड) येथे उत्साहात व यशस्वीरीत्या संपन्न झाली. देशभरातील कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी देशातील सर्व जिल्हा मुख्यालयांवर देशव्यापी धरणे आंदोलन आयोजित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

भारतीय मजदूर संघाच्या राष्ट्रीय कार्यसमितीने केंद्र सरकारला वरील सर्व मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याचे आवाहन केले आहे. कामगारांच्या न्याय्य व प्रलंबित मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास देशभरात व्यापक जनआंदोलन उभारण्याचा निर्धारही बैठकीत व्यक्त करण्यात आला.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी भारतीय मजदूर संघाचे अखिल भारतीय अध्यक्ष एस. मल्लेशम होते. यावेळी अखिल भारतीय महामंत्री सुरेंद्र कुमार पांडे, संघटन मंत्री बी. सुरेंद्रन, माजी अखिल भारतीय अध्यक्ष सी. के. साजी नारायणन, हिरण्मय पंड्या, महाराष्ट्राचे केंद्रीय सचिव अनिल ढुमणे, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस किरण मिलगीर, अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाचे सरचिटणीस सचिन मेंगाळे, अण्णा धुमाळ, बंदरे उद्योग, , परिवहन महासंघाचे महामंत्री राजू भालेराव, प्रवासी कामगार प्रकोष्ठाचे प्रभारी श्रीपाद कुटासकर, बॅंक प्रभारी रामनाथ किणी , श्रीमती तृप्ती आळती, रेल्वे उद्योग मंगेश देशपांडे, बाळासाहेब भुजबळ यांच्यासह महाराष्ट्रातील सुमारे २० वरिष्ठ पदाधिकारी तसेच देशभरातील विविध उद्योग महासंघांचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य आणि प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भारतीय मजदूर संघ, महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष सुधांशू रानडे आणि प्रदेश सरचिटणीस श्री किरण मिलगीर यांनी राज्यातील सर्व संलग्न संघटना, पदाधिकारी आणि हजारो कामगारांना दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित देशव्यापी धरणे आंदोलनात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी आवाज बुलंद करण्याचे आवाहन केले आहे.

या आंदोलनाद्वारे केंद्र सरकारकडे पुढील प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत :

1. ईएसआयसी (ESIC) वेतन मर्यादा ₹२१,००० वरून ₹४२,००० करण्यात यावी. 2. ईपीएफ (EPF) अंतर्गत किमान पेन्शन ₹१,००० वरून ₹७,५०० प्रतिमहिना करण्यात यावी. 3. ईपीएफ वेतन मर्यादा ₹१५,००० वरून ₹३०,००० करण्यात यावी. 4. बोनस गणनेसाठी वेतन मर्यादा ₹७,००० वरून ₹१८,००० करण्यात यावी. 5. बोनस पात्रतेची वेतन मर्यादा ₹२१,००० वरून ₹४२,००० करण्यात यावी. 6. सर्व योजना (Scheme) कामगारांचे मानधन भरीव प्रमाणात वाढविण्यात यावे. 7. कंत्राटी व आउटसोर्सिंग कामगारांना "समान काम – समान वेतन" या तत्त्वाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. 8. श्रमसंहितांमधील (Labour Codes) कामगारविरोधी तरतुदी रद्द अथवा आवश्यक त्या सुधारणा करण्यात याव्यात. 9. बँक कर्मचाऱ्यांसाठी आठवड्यातील पाच दिवसांचा कामकाजाचा नियम तातडीने लागू करण्यात यावा. 10. ग्रॅच्युइटीची कमाल मर्यादा ₹२० लाखांवरून ₹४० लाखांपर्यंत वाढविण्यात यावी तसेच सर्व पात्र कामगारांना ग्रॅच्युइटीचा लाभ सुनिश्चित करण्यात यावा. 11. देशातील सर्व कामगारांसाठी किमान वेतन ₹३०,००० प्रतिमहिना निश्चित करण्यात यावे.

## पतंजलीच्या वतीने जिंतूर येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी



**जिंतूर, दि. 29 जुलै :** पतंजली योगपीठ, हरिद्वार यांच्या निर्देशानुसार जिंतूर येथे गुरुपौर्णिमानिमित्त योगसाधना, वैदिक यज्ञ आणि गुरु महिमा याविषयी प्रबोधनपर कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

यावेळी भारत स्वाभिमानचे जिल्हा कोषाध्यक्ष वसंतराव देशमुख, पतंजली किसान सेवा समितीचे तहसील प्रभारी लखूजी जाधव, सोशल मीडिया तहसील प्रभारी सचिन रायपात्रीवार, संरक्षक सदस्य हरिभाऊ केंद्रे, युवा भारतचे सहप्रभारी संतोष आंधळे तसेच गेल्या साडेचार वर्षांपासून नियमित सुरू असलेल्या स्थायी योगवर्गाचे सदस्य विश्वनाथ बोरुंडे, रवी आढे, ज्ञानेश्वरजी, दिलीपराव राठोड, चव्हाणजी, दत्ताभाऊ तळेकर, गजाननजी, विष्णु जाधव, किशनराव वाटाणे, अश्विन सोनवणे आणि अन्य साधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचा समारोप शांतिपाठाने करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमात गुरुभक्ती, योगसाधना आणि भारतीय संस्कृतीचा जागर जागर प्रसार करण्याचा संदेश देण्यात आला.

सकाळी 5.30 ते 7.00 या वेळेत नियमित योगवर्गाचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर वरुड रोडवरील साई सृष्टी गार्डन येथे सकाळी 7.00 ते 8.30 या वेळेत वैदिक पद्धतीने यज्ञ करण्यात आला. यज्ञामध्ये अनेक साधकांनी सहभागी होत वातावरण भक्तिमय केले.

या कार्यक्रमात भारत स्वाभिमान न्यासचे जिल्हा प्रभारी धोंडीराम शेप यांनी गुरूंचे जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित केले. जीवनाला योग्य दिशा, ज्ञान, संस्कार आणि मूल्यांची जाणीव करून देण्याचे कार्य गुरू करतात. गुरूंच्या ऋणाची जाणीव ठेवून त्यांचे स्मरण करण्यासाठी गुरुपौर्णिमा हा अत्यंत पवित्र दिवस असल्याचे त्यांनी सांगितले.

## आर्यानंदी कॉलनीत आचार्य श्री हेमसागरजी गुरुदेव यांच्या गुरुपूजनाचा भक्तिमय सोहळा



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त आर्यानंदी कॉलनी येथील चंद्रप्रभ दि. जैन मंदिरात तपस्वी सम्राट आचार्य गुरुवर १०८ श्री सन्मतिसागरजी महाराज तथा सिद्धांत चक्रवर्ती आचार्य श्री हेमसागरजी गुरुदेव यांच्या गुरुपूजनाचा भक्तिमय सोहळा मोठ्या उत्साहात आणि श्रद्धाभावाने संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात भगवान श्रीजींच्या पंचामृत अभिषेकाने झाली. त्यानंतर वाद्यांच्या मंगल निनादात गुरुवरांचे आगमन होत भाविकांनी पादप्रक्षालन करून गुरुपूजन केले. संगीतमय गुरुपूजनाचे सादरीकरण श्री सुमितजी खेडकर यांनी केले. त्यांच्या ओजस्वी आणि भक्तिमय सादरीकरणामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला.

कार्यक्रमात सौ. प्रियांका प्रितेशजी गंगवाल यांनी आकर्षक पूजन थाळी संच तयार करून मोलाचे योगदान दिले. आयोजकांच्या आवाहनाला प्रतिसाद देत भाविकांनी कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थिती लावत गुरुवरांच्या चरणी वंदन करून आशीर्वाद घेतले.

यावेळी आचार्य श्री हेमसागरजी गुरुदेव यांनी प्रवचनातून गुरुचे जीवनातील महत्त्व विशद करत धर्म, संयम, शांती आणि सदाचाराचा संदेश दिला. गुरुकृपेने प्रत्येकाच्या जीवनात मंगलमयता नांदो, अशी प्रार्थना त्यांनी व्यक्त केली. भक्ती, श्रद्धा आणि आध्यात्मिक वातावरणात गुरुपौर्णिमेचा हा सोहळा उत्साहात संपन्न झाला.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात जागतिक निसर्ग संवर्धन दिन उत्साहात साजरा;डॉ.संतोष पडघन यांचे पर्यावरण संवर्धनावर प्रेरणादायी मार्गदर्शन




सोयगाव,दि.२९ जुलै

निसर्गाचे जतन आणि संवर्धन ही काळाची गरज असून, पर्यावरणाचे संरक्षण केल्याशिवाय मानवाचे अस्तित्व सुरक्षित राहू शकत नाही.युवकांनी पर्यावरण रक्षणाची जबाबदारी स्वीकारून वृक्षारोपण,जलसंवर्धन आणि प्लास्टिक मुक्त समाज निर्मितीसाठी पुढाकार घ्यावा,असे प्रतिपादन डॉ.संतोष पडघन यांनी केले.

जागतिक निसर्ग संवर्धन दिनानिमित्त संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून डॉ.पडघन यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षण,जैवविविधतेचे महत्त्व,हवामान बदलाची गंभीरता तसेच शाश्वत विकासाची आवश्यकता याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी पर्यावरण संवर्धन ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी असल्याचे सांगून विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात पर्यावरणपूरक सवयी अंगीकाराव्यात,असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.विद्यार्थ्यांनी व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत पर्यावरण संरक्षणाची शपथ घेतली. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ.मनोजकुमार चोपडे,डॉ. रामेश्वर मगर,डॉ.शंतनु चव्हाण,डॉ. श्रीकृष्ण परिवार,डॉ. विनोद बारोटे,शिक्षकेतर कर्मचारी,राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.सुनील चौधरे यांनी केले व आभारप्रदर्शन डॉ. दिपक पारधे यांनी मानले.

## लोहमार्ग दुहेरीकरणासाठी जमीन मोजणी... छत्रपती संभाजीनगर ते परभणी प्रयन्त चे आदेश

हिंदु प्रकाश वार्ता .प्रतिनिधी.

**परभणी,:-**छत्रपती संभाजी नगर ते परभणी दरम्यान लोहमार्गाचे दुहेरीकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी छत्रपती संभाजी नगर तालुक्यातील विविध गावांमध्ये मोजणी पूर्ण झाली असून लवकरच अंतिम अधिसूचना जारी होईल अशी माहिती सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी एकनाथ बंगाळे यांनी दिली...

या रेल्वे मार्गासाठी एकूण 21 हेक्टर जमीन संपादित केली जाणार असल्याचे उपजिल्हाधिकारी बंगाळे यांनी नमूद केले.

लोहमार्ग दुहेरीकरणासाठी तालुक्यातील गाढे जळगाव. कुंभेफळ. वरुडकाझी. फत्तेपूर. करंजगाव. मुस्तफाबाद. करमाड. शेंद्रा. जहांगीर. लाडगाव. सातारा. मुकुंदवाडी. चिकलठाणा. दक्षिण चिकलठाणा. मुर्तीजापुर. हसनाबादवाडी. देवणी. शेकटा. शहानुरवाडी. गारखेडा आदी गावातील सुमारे 21 हेक्टर जमीन संपादित करण्यात येणार आहे.

संबंधित गावातील गट क्रमांकाची मोजणी निश्चित तारखेनुसार करण्यात आली.दि.30. एप्रिल रोजी गारखेडा येथून मोजणीला सुरू झाली होती. महापालिका हद्दीतील दक्षिण बाजूने सुमारे आठ हेक्टर जमीन संपादित होणार आहे. संयुक्त मोजणीचे काम नुकतेच पूर्ण झाले त्यानंतर भूमी अभिलेख विभागाचा अहवाल देखील सादर झाला असून आता अंतिम अधिसूचना जारी करण्याबाबत कार्यवाही सुरू असल्याची माहिती बंगाळे यांनी दिली. अंकाई-टंचाई ते छत्रपती संभाजीनगर यादरम्यान 19 गावे असून यातील 13 गावातील भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाली. अँवार्ड. भूसंपादनाचा अवार्ड देखील जाहीर करीत संबंधितांना सुमारे 25 कोटी रुपयांचा मावेजा अदा करण्यात आल्याचे सूत्रांनी नमूद केले..

दरम्यान रेल्वे मार्गाच्या या दुहेरीकरणामुळे परिसरातील गावांच्या विकासाला गती मिळेल असा विश्वास व्यक्त केला जात आहे. प्रवाशांनाही या सुविधेचा लाभ होणार आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान : जरंडी ग्रामपंचायतीच्या कामांची विभागीय स्तरावर पाहणी

### विभागीय अधिकाऱ्यांकडून कामकाजाचे कौतुक; ग्रामपंचायतीच्या विकासकामांवर स्तुतीसुमने



सोयगाव,दि.२९ जुलै : सोयगाव तालुक्यातील ग्रामपंचायत जरंडी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत करण्यात आलेल्या विकासकामांची विभागीय स्तरावरील तपासणी मंगळवारी पार पडली.या पाहणीदरम्यान अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतीच्या विविध विकासकामांची सविस्तर माहिती घेत समाधान व्यक्त केले.

यावेळी प्रांजल शिंदे (अप्पर आयुक्त,विकास विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय,पुणे), रवींद्र कापसे (आयुक्त, विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय,पुणे),प्रकाश बोंबले (सहाय्यक गट विकास अधिकारी), ग्रामपंचायत अधिकारी नवनाथ झोळ तसेच ग्रामपंचायत अधिकारी सुनिल मंगरुळे उपस्थित होते.

अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायतीने राबविलेल्या विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करून त्याची सविस्तर माहिती घेतली. ग्रामविकास, स्वच्छता,मूलभूत सुविधा आणि ग्रामपंचायतीच्या कार्यपद्धतीबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी ग्रामपंचायत अधिकारी सुनिल मंगरुळे,तसेच तत्कालीन सरपंच,उपसरपंच आणि सदस्यांनी विकासकामांच्या अंमलबजावणीसाठी केलेल्या नियोजनबद्ध व प्रभावी कार्याचे अधिकाऱ्यांनी विशेष कौतुक केले. ग्रामपंचायतीने अभियानाच्या उद्दिष्टांनुसार केलेले कार्य इतर ग्रामपंचायतींसाठी प्रेरणादायी असल्याचे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.

या विभागीय तपासणीमुळे जरंडी ग्रामपंचायतीच्या विकासकामांना अधिक बळ मिळणार असून, ग्रामविकासाच्या दिशेने केलेल्या प्रयत्नांची विभागीय स्तरावर दखल घेतल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# स्वयम् शिक्षण प्रयोग मार्फत जिल्हास्तरीय संवाद कार्यशाळा संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** कृषी विज्ञान केंद्र, छत्रपती संभाजीनगर येथे आज दि. 28 जुलै 2026 रोजी जिल्हास्तरीय संवाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजन स्वयम् शिक्षण प्रयोग (SSP) आणि कृषी विज्ञान केंद्र यांच्या मार्फत करण्यात आले. कार्यक्रमास विशेष अतिथी श्रीमती मिन्नू पी. एम. मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर, माननीय डॉ. राकेश अहिरे सर संचालक विस्तार शिक्षण वनामकृषी परभणी, तसेच माननीय डॉ. सूर्यकांत पवार सहयोगी संचालक संशोधन एनएआरपी छ. संभाजीनगर, तसेच डॉ. दीप्ती पाटगावकर मॅडम कार्यक्रम समन्वयक कृषी विज्ञान केंद्र, यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात शेतीमध्ये सतत राबणाऱ्या शेतकरी महिलांच्या माध्यमातून दिंडीचे प्रदर्शन करून करण्यात आली, त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून मार्गदर्शनास सुरुवात झाली.

या कार्यशाळेत एसएसपी कडून प्रेमा ताई गोपालन यांच्या महिला सक्षमीकरण विषयी विचारांना उजाळा देण्यात आला. तसेच संस्थेच्या सीईओ मा. नसीमताई शेख यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात येत असलेल्या प्रकल्पाची माहिती सादर करण्यात आली. प्रकल्प व्यवस्थापक श्री. सम्राट कसबे सर, कृषी विज्ञान केंद्राकडून डॉ. अनिता जिंतुरकर, डॉ. संजुला देशमुख, डॉ. बसवराज पिसुरे आणि डॉ. विवेक पाटणे या कृषी तज्ञ यांनी मार्गदर्शन केले. सिल्लोड तालुक्यातील एकूण ५० गावांतील 120 महिला शेतकरी या कार्यशाळेत सहभागी झाल्या.

या कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. दीप्ती पाटगावकर मॅडम कार्यक्रम समन्वयक कृषी विज्ञान केंद्र यांनी केली, त्यानंतर कार्यक्रम अध्यक्ष माननीय कुलगुरू वनामपक्रवी परभणी डॉ. इंद्रमनी सर यांनी महिलांना ऑनलाईन मार्गदर्शन केले. त्यांनी आंतरराष्ट्रीय महिला वर्षानिमित्त महिलांना शुभेच्छा देऊन शेतीमध्ये महिलांचा खूप चांगल्या पद्धतीने सहभाग वाढलेला दिसतो, तसेच महिलांनी शेतीसोबतच शेतीपूरक व्यवसायावरती देखील भर दिला पाहिजे, महिलांनी व्यवसायाची ऑनलाइन मार्केटिंग मध्ये देखील भर दिला पाहिजे असे आव्हान केले.

तसेच कार्यक्रमामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिन्नू पीएम यांनी महिलांना मार्गदर्शन करताना महिलांनी शेतीमध्ये देखील निर्णय प्रक्रियेमध्ये आलं पाहिजे, तसेच महिलांच्या नावे दहा जमीन असली पाहिजे, महिलांनी शेतीपुरक व्यवसाय करावे असे मार्गदर्शन केले. त्याबरोबर महिलांना माननीय डॉ. सूर्यकांत पवार सरांनी शेतीतील खत व्यवस्थापन, पिकांचे व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले.

तसेच माननीय डॉ. राकेश अहिरे सरांनी महिलांनी छोटे-मोठे व्यवसाय उद्योग करून स्वतः आर्थिक सक्षम बनावे , तसेच शेतीमध्ये मिश्र पीक पद्धती व जैविक पद्धतीचा वापर करावा हे सुचविले. डॉ. अनिता जिंतुरकर यांनी कृषीपूरक व्यवसायातून उत्पन्न वाढविण्याचे मार्ग सांगितले.

कार्यक्रमात SSP चे वैशाली घुगे, अर्चना कोळी, शुभम कुमावत अंजली झाडके, पुष्पा तूपे, शांभवी सोनटक्के उपस्थित होते. शेवटी महिला शेतकऱ्यांनी सरकारी अधिकारी व विषय तज्ञांशी संवाद साधून आपले प्रश्न मांडले व मार्गदर्शन घेतले.

# बाबाजींच्या वेरूळ आश्रमात भक्तांची मांदळी गुरुपौर्णिमेला लाखो भाविक उपस्थित: 21 फूट मूर्ती निर्माण संकल्प

**खुलताबाद प्रतिनिधी श्री क्षेत्र वेरूळ वेरूळ,जि. छत्रपती संभाजीनगर:** निष्काम कर्मयोगी शिवयोगी जगद्गुरू जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज यांच्या स्मृतीला उजाळा देत उत्तराधिकारी अध्यात्म शिरोमणी जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत 'श्री क्षेत्र वेरूळ' येथे गुरुपौर्णिमा महोत्सव लाखो भाविकांच्या उपस्थितीत अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडला. मुसळधार पावसाची तमा न बाळगता भाविकांनी या सोहळ्याला हजेरी लावल्याने गुरुभक्तीच्या जनसागरात ते न्हाऊन निघाले. सोहळ्याप्रसंगी श्री बाबाजींच्या पावन स्मृतींचा जागर करत जगदगुरू स्वामी शांतिगिरीजी महाराजांचे मार्गदर्शन व आशीर्वाद भाविकांना लाभले. कृपाशीर्वाद प्राप्त करण्यासाठी भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे बाबाजींच्या चांदीच्या रथाची भोसले चौक ते वेरूळ गुरुकुल येथील कार्यक्रमस्थळ भव्य मिरवणूक संपन्न झाली.



त्यानंतर वेरूळ गुरुकुल येथील मैदानावर शांतीगिरी महाराज यांच्याहस्ते पाद्यपूजा करण्यात आली. पाद्यपूजनासाठी देशातील प्रमुख व पवित्र नद्यांचे जल विशेष रूपाने संकलित करून आणण्यात आले होते. त्र्यंबकेश्वर येथील महेश शिखरे गुरुजी यांच्या पौरोहित्याखाली हा धार्मिक विधी संपन्न झाला. याशिवाय, विविध आश्रमांमधील १२५ पादुकांचे पूजन करण्यात आले. या सोहळ्याला विविध आश्रमांतील संत-महंतांची पावन उपस्थिती लाभली होती. वेरूळ भाविकांच्या महाप्रसादासाठी आश्रमात ४ वेगवेगळ्या ठिकाणी व्यवस्था करण्यात आली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विवेकानंद महाराज व शिवा अंगुलगावकर यांनी केले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी जय बाबाजी भक्त परिवार, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले, अशी माहिती राजेंद्र पवार यांनी दिली.

**२१ फुटी मूर्ती स्थापनेचा संकल्प :**

वेरूळ आश्रमामध्ये जनार्दन स्वामींच्या २१ फुटांच्या भव्य मूर्ती स्थापनेचा संकल्प करण्यात आला आहे. या निर्माण कार्याच्या संकल्पपूर्तीसाठी हजारो भाविकांनी गुरुदक्षिणा अर्पण करून सहभाग नोंदवला. बाबाजींनी अयोध्या येथे झालेल्या वार्षिक तीर्थयात्रा सोहळ्याप्रसंगी या मूर्तीच्या निर्माण कार्यासाठी विटा आणण्याचे आवाहन केले होते. त्यास प्रतिसाद देत हजारो भाविकांनी शरयू नदीचे पवित्र जल आणि विटा आणून हा संकल्प भक्तिभावाने पूर्ण केला.)

**राजकीय व सामाजिक मान्यवरांची उपस्थिती :**

या अध्यात्मिक सोहळ्यास उद्योगमंत्री उदय सामंत, छत्रपती संभाजीनगरचे उपमहापौर व जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ, निफाडचे आमदार दिलीप बनकर आणि विधानपरिषद सदस्य सुहास शिरसाठ यांसह अनेक मान्यवरांनी हजेरी लावून दर्शन घेतले. आश्रमाचे संत ब्र. भगीरथानंद महाराज व नाशिक येथील नाना गामने यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांचे स्वागत करण्यात आले.

# राष्ट्रीय ग्रीन युनिव्हर्सिटी रँकिंग-2026 मध्ये वनाकृविला देशात 18 वे स्थान; 'गोल्ड' रेटिंगने गौरव

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:**-वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीने पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकास आणि हरित कॅम्पस उभारणीच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत नॅशनल ग्रीन युनिव्हर्सिटी रँकिंग (NGUR)-२०२६ मध्ये देशात १८ वे स्थान मिळविले आहे. विद्यापीठाला १०० पैकी ९१.६ गुणांसह 'गोल्ड' रेटिंग प्रदान करण्यात आले आहे. ही माहिती ग्रीन मेंटर्स संस्थेने विद्यापीठाला पाठविलेल्या अधिकृत पत्राद्वारे दिली आहे.

ग्रीन मेंटर्सतर्फे आयोजित करण्यात आलेली नॅशनल ग्रीन युनिव्हर्सिटी रँकिंग (NGUR)-२०२६ ही देशातील उच्च शिक्षण संस्थांच्या शाश्वत विकास, पर्यावरण व्यवस्थापन आणि हरित उपक्रमांचे

कृषिमूलं हि जीवनम् शेतकरी देवो भवः





मूल्यमापन करणारी राष्ट्रीय स्तरावरील मानांकन प्रक्रिया आहे. या मूल्यमापनामध्ये शाश्वत प्रशासन, हरित परिसर, जैवविविधता, हवामान कृती, ऊर्जा कार्यक्षमता, संशोधन व नवोपक्रम, अभ्यासक्रमातील शाश्वतता, जलसंधारण, कचरा व्यवस्थापन, वाहतूक आणि समाजाभिमुख उपक्रम अशा दहा निकषांवर विद्यापीठांचे मूल्यांकन करण्यात आले.

विद्यापीठाच्या सादर केलेल्या कागदपत्रांचे, शाश्वत विकास उपक्रमांचे, पर्यावरणीय कामगिरीचे आणि विविध पुराव्यांचे सखोल परीक्षण करून ही मानांकन प्रक्रिया पार पडली. या मानांकनामुळे वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या शाश्वत विकास, पर्यावरणपूरक कॅम्पस उभारणी आणि हरित शिक्षण क्षेत्रातील कार्याला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली असून, विद्यापीठाला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध शाश्वत विकास उपक्रम, संशोधन सहकार्य आणि परिषदांमध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

या यशाबद्दल माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी नमूद केले की, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाला राष्ट्रीय ग्रीन युनिव्हर्सिटी रँकिंग

# मद्यधुंद मुजोर रिक्षाचालकांचा थैमान; 96 रिक्षा जप्त, 1,285 रिक्षांवर कारवाईचा केवळ दिखावा, चौकात 'बुजगावणे' बनून उभे राहतात वाहतूक पोलीस!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर विशेष प्रतिनिधी :** शहरात वाहतूक शिस्तीचा मोठा गाजावाजा करत वाहतूक पोलिसांनी कागदी घोडे नाचवत १,२८५ रिक्षांवर दंडात्मक कारवाई केल्याचा फुगलेला दावा केला आहे. प्रशासनाने भलेही आकड्यांचे खेळ करत स्वतःच्या पाठीवर थापा मारून घेतल्या असतील, पण वास्तवात शहराच्या गल्लीबोळांत आणि मुख्य रस्त्यांवर मद्यधुंद, बेफिकीर आणि उर्मट रिक्षाचालकांची दहशत आजही कायम असून, सामान्य नागरिकांचा जीव रोज मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

काही दिवसांपूर्वीच बायपास रोडवर भरधाव आणि बेकदर आणि भरधाव वेगाने ऑटोमुळे झालेल्या भीषण अपघातात



एका निष्पाप महिलेला आपला जीव गमवावा लागला होता. एका हसत्याखेळत्या संसाराची राखरांगोळी झाली असताना, खाकी वर्दीतील कर्तेधर्ते नेमके काय करत आहेत? असा संतप्त सवाल आता सर्वसामान्यांच्या काळजाला हात घालावा असाच निर्माण झाला आहे. रस्त्यावर निष्काळजीपणाने ऑटो चालवून सर्वसामान्यांचे नाहक बळी जात असताना, वाहतूक पोलिसांची ही थंड, हफ्ताखोर आणि संशयास्पद भूमिका अत्यंत चीड आणणारी आहे. किरकोळ नियमभंगांवर कारवाईचा आव आणून पोलीस प्रशासन स्वतःचे भ्रष्ट पाप झाकत आहे का? या मुजोर रिक्षाचालकांच्या अंगात मुरलेली मस्ती आणि निष्पाप लोकांच्या मृत्यूला नेमका जबाबदार कोण?

जर यापुढे नशेत गाड्या हाकणाऱ्यांवर, मुजोरी करणाऱ्यांवर आणि नागरिकांचे जीव घेणाऱ्यांवर कठोर फौजदारी गुन्हे दाखल करून धडक कारवाई झाली नाही, तर संतप्त जनतेचा हा उद्रेक पोलिसांच्या अंगाशी येईल, यात तिळमात्र शंका नाही!

**चौकात खाकीचे 'बुजगावणे'; हफ्त्याच्या खेळाने रिक्षावाले मोकाट! :** प्रत्यक्षात वस्तुस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. चौकाचौकात अंगावर पोलिसांचा गणवेश घालून वाहतूक शाखेचे कर्मचारी केवळ 'बुजगावण्यासारखे' उभे असलेले दिसतात. कारवाईच्या नावाखाली फक्त किरकोळ आणि सामान्य प्रवाशांना वेठीस धरायचे, आणि मूळ मुजोर, उद्धट तसेच मद्यधुंद रिक्षाचालकांकडून खिसे गरम करून त्यांना थेट सोडून द्यायचे, हाच एकमेव खाकी धंदा सध्या तेजीत सुरू आहे. जेव्हा रक्षकच भक्षक बनतात आणि हफ्त्यांच्या बदल्यात गुन्हेगारांना अभय देतात, तेव्हा सर्वसामान्यांच्या सुरक्षिततेची हमी कोण देणार?

**चोर सोडून संन्याशाला फाशी देण्याचाच लाजीरवाणा कारभार! :** आज शहरात दारूच्या नशेत धिंगाणा घालून ऑटो चालवण्याचे प्रमाण चिंताजनक रीतीने वाढले आहे. विनापरवाना, विनागणवेश आणि फ्रंट सीटवर प्रवाशांची कोंडी करत जीवघेण्या स्टाईलने गाड्या पळवणाऱ्यांची मुजोरी टोकाला पोहोचली आहे. पोलिसांनी कागदोपत्री काही लाखांचा दंड वसूल केल्याची नौटंकी केली असली, तरी नशेत धिंगाणा घालून निष्पाप नागरिकांचे बळी घेणाऱ्या मुजोर चालकांवर ठोस आणि बेड्या ठोकणारी कारवाई करण्याचे

# मनपा शाळा एन-७ सिडकोमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

## विद्यार्थ्यांची भाषणे, गुरुजनांचा सन्मान आणि प्रेरणादायी मार्गदर्शनाने कार्यक्रमाला रंगत

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, एन-७ सिडको येथे गुरुपौर्णिमा उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. भारतीय संस्कृतीतील गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे आणि गुरुजनांप्रती आदराची भावना दृढ व्हावी, या उद्देशाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक मनोज अग्रवाल होते. यावेळी विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व विशद करणारी प्रभावी भाषणे सादर केली. अंजली कुलकर्णी व वेंकट जाधव यांनी विद्यार्थ्यांना गुरूंचे जीवनातील स्थान, संस्कारांचे महत्त्व आणि शिक्षणाचे मूल्य याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासपूर्ण पद्धतीने केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने ज्ञान, संस्कार आणि कर्तव्यनिष्ठेचा संदेश दिला. कार्यक्रमामुळे शाळेत भक्तिमय आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका तसेच सेवकांनी परिश्रम घेतले. उपस्थितांनी कार्यक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उत्स्फूर्त दाद दिली.

# 1962 हेल्पलाइन व व्हॉट्सॲप चॅटबॉटद्वारे राज्यातील पशुवैद्यकीय सेवांना गती

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी:** राज्यातील पशुपालकांना घरपोच पशुवैद्यकीय सेवांचा लाभ मिळवून देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने कार्यान्वित केलेल्या १९६२ कॉल सेंटर व व्हॉट्स अप चॅटबॉट सेवेला पशुपालकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. जुलै-2026 मध्ये राज्यातील ३५,०६८ पशुपालकांना पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात आली असून, व्हॉट्स अप चॅटबॉटच्या माध्यमातून ५९९ पशुपालकांना ऑडियो-व्हिडिओच्या माध्यमातून पशुवैद्यकीय सेवांचा लाभ देण्यात आला आहे. पशुपालकांना अधिक जलद व तात्काळ सेवा देण्यासाठी 'व्हॉट्सॲप चॅटबॉट' सेवेला पशुपालकांचा मिळणारा प्रतिसाद दिवसेंदिवस वाढत आहे.

महाराष्ट्र शासनाचा पशुसंवर्धन विभाग, भारत फायनान्शियल इंक्लुजन लिमिटेड (BFIL), इंडसइंड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील पशुवैद्यकीय सेवांचे जाळे अधिक सक्षम करण्यात येत आहे. 'व्हॉट्सॲप चॅटबॉट' सेवेमुळे पशुपालकांना व्हिडिओद्वारे थेट डॉक्टरांशी संपर्क साधून मार्गदर्शन मिळविणे शक्य झाले आहे. शेतकरी 9063142299 या क्रमांकावर व्हॉट्सॲपवर "Hi" पाठवून किंवा QR कोड स्कॅन करून ही सेवा मिळवू शकतात.

माहे जुलै-2026 मध्ये १९६२ या कॉल सेंटर क्रमांकावर आतापर्यंत ३५,०६८ पशुपालकांनी संपर्क साधला असून, त्यातील योजना व इतर पशुसंवर्धन विषयक माहितीचे कॉल वगळता ३१,७५५ पशुपालकांना मोबाईल व्हेटर्नरी क्लिनीकच्या माध्यमातून पशुवैद्यकीय सेवांचा पुरवठा करण्यात आला आहे.

# गुरुपौर्णिमेनिमित्त रामनगर येथील श्री स्वामी समर्थ केंद्रात भक्तांचा जनसागर

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर :** आषाढ पौर्णिमेच्या पावन पर्वावर साजऱ्या करण्यात आलेल्या गुरुपौर्णिमेनिमित्त रामनगर येथील श्री स्वामी समर्थ केंद्रात गुरुपद ग्रहण करण्यासाठी तसेच श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली. पहाटेपासूनच केंद्र परिसरात भक्तांचा ओघ सुरू झाला होता. सकाळ होताच दर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या रांगा केंद्राबाहेरपर्यंत पोहोचल्या होत्या. महिला आणि पुरुषांसाठी स्वतंत्र रांगांची व्यवस्था करण्यात आल्याने दर्शन व गुरुपद ग्रहणाची प्रक्रिया शिस्तबद्ध आणि सुरळीत पार पडली.

गुरुपौर्णिमा हा भारतीय संस्कृतीत गुरुचे स्थान सर्वोच्च मानणारा दिवस असून, या दिवशी गुरुंचे पूजन, आशीर्वाद आणि आध्यात्मिक मार्गदर्शन घेण्यास विशेष महत्त्व आहे. याच पार्श्वभूमीवर श्री स्वामी समर्थ केंद्रात दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पूजन, आरती, नामस्मरण आणि गुरुपद ग्रहणाचे विधी भक्तिभावाने पार पडले.

"श्री स्वामी समर्थ... श्री स्वामी समर्थ..." या अखंड नामघोषाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वच वयोगटातील भाविकांनी मोठ्या श्रद्धेने उपस्थिती लावली. अनेक कुटुंबांनी एकत्रितपणे गुरुपद ग्रहण करून श्री स्वामी समर्थांच्या चरणी सुख, समृद्धी, आरोग्य आणि कुटुंबाच्या कल्याणासाठी प्रार्थना केली.

# गुरुवर्य अक्का महाराज यांच्या उपस्थितीत गुरुपौर्णिमेनिमित्त श्री क्षेत्र वेरूळ नाथ आश्रम येथे हजारो भाविक भक्तांनी घेतले आशीर्वाद

हिंदू प्रकाश वार्ता

**छत्रपती संभाजी नगर जिल्हा प्रतिनिधी :** श्री क्षेत्र वेरूळ येथील बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदिराच्या सानिध्यात असलेले विविध आश्रम, मठ आणि मंदिरामध्ये गुरुपौर्णिमेनिमित्त भक्तांची मांदियाळी बघावयास मिळाली. यावेळी पहाटेपासूनच भक्तांनी गुरु महिमा जाणत आपापल्या गुरूंकडे जाऊन सेवा व गुरुपौर्णिमेनिमित्त गुरु पूजन करून आशीर्वाद घेतला.

नाथ आश्रम या ठिकाणी




वेरूळ गावचे सरपंच कुसुमताई प्रकाश पाटील मिसाळ भारतीय जनता पार्टी जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे खुलताबाद पंचायत समितीचे माजी सभापती तथा पंचायत समिती सदस्य दिनेश अंभोरे नगरसेवक परसराम परसराम बारगळ उद्योजक शेख नाथ पाटील नागे उद्योजक मनसाराम मातकर ह भ प नारायण भांबर्डे तुकाराम मते कैलास मिसाळ संतोष करपे श्रीमती कल्पना कदम गणेश गायके पुंजाराम धोत्रे आदींच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला

विविध ठिकाणाच्या पवित्र नदी व तीर्थांचे पाणी आणून सद्गुरु अक्काताई महाराज यांचे पूजन केले. तसेच नाथ भक्त परिवारातील तरुण युवकांनी श्रीक्षेत्र मढी ते श्रीक्षेत्र वेरूळ या दरम्यान पायी दिंडी करीत कावड यात्रेमध्ये पाणी आणून भगवान मच्छिंद्रनाथाला जलाभिषेक केला.

यावेळी सद्गुरु अक्काताई महाराजांनी गुरुपौर्णिमेनिमित्त आलेल्या नाथ भक्तांना शुभ आशीर्वाद देऊन जीवन आणि पर्यावरण तसेच मानवी मूल्ये यावर उपदेश करीत भक्तांनी सन्मार्गाकडे जावे व्यसनांपासून दूर राहावे शिक्षण आणि सामर्थ्य निर्माण करावे तरच आपल्या आणि आपल्या समाजाचा विकास होईल असे उपदेश करीत आशीर्वाद दिला. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आल आली.

# ग्रामीण भागातील दळणवळण सक्षम करणे हेच आमचे मुख्य ध्येय - आ.तान्हाजी मुटकूळे

हिंदू प्रकाशवार्ता : गोपाल सातपुते

हिंगोली | ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था सक्षम करणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे. दर्जेदार रस्त्यांशिवाय गावांचा विकास वेगाने होऊ शकत नाही,असे प्रतिपादन आमदार तान्हाजीराव मुटकूळे यांनी केले. कडती-नर्सी-नामदेव-पहेणी-अठ्ठरवाडी आणि सरकळी-वरुडकाजी-वरुड-पुसेगाव-खुडज या मुख्य रस्त्याच्या कामाचा भूमिपूजन सोहळा त्यांच्या हस्ते पार पडला, त्याप्रसंगी ते बोलत होते.

प्रमुख गावांना जोडणारे हे मुख्य रस्ते गेल्या अनेक दिवसांपासून खराब अवस्थेत होता. यामुळे स्थानिक नागरिक, शेतकरी आणि



विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत होता. हा प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार तान्हाजीराव मुटकूळे यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले असून, शासनाकडून या दोन रस्त्यासाठी १६ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. मंजुरीनंतर आता प्रत्यक्ष कामालाही सुरुवात झाली आहे.

पुढे बोलताना आमदार मुटकूळे म्हणाले की, या १६ कोटी रुपयांच्या निधीतून तयार होणारे रस्ते या परिसरातील नागरिकांचा प्रवास अधिक सुकर आणि सुरक्षित करेल. कामाचा दर्जा उत्तम राखण्यावर आमचा विशेष भर असेल आणि हा रस्ता हिंगोलीच्या ग्रामीण भागाच्या विकासाला नवी गती देईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या भूमिपूजन सोहळ्याला ज्येष्ठ नेते के.के. शिंदे, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे,प्रकाशराव थोरात, नारायण खेडकर, संतोष टेकाळे, तालुकाध्यक्ष माणिक लोडे,राजू जाधव कडतीकर भाजपा युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष बद्रीनाथ जगताप जिल्हा प्रवक्ता विलास गोरे,गजानन खंदारे,सुदर्शन सावजी,अंभोरे सरपंच,मुरलीधर कापसे,संतोष कापसे,दामोधर जाधव,शंकर वाबळे,परसराम आठरे,खंडू पाटील,कांतराव गायवाळ,वामन सोमोसे,माधव गायवाळ,बंडू गायवाळ,कंत्राटदार एकलारे,भाटीया यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी आणि परिसरातील ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मत्स्योदरी शिक्षण संस्थेस मान्यवरांची सदिच्छा भेट



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगर विभागाचे *अध्यक्ष अनिल साबळे तसेच सचिव/सहसंचालक रवींद्र वाणी आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी बाळासाहेब खरात यांनी आज मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या कार्यालयास सदिच्छा भेट दिली.

याप्रसंगी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड सर यांनी मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन स्नेहपूर्वक सत्कार केला तसेच गुरुपौर्णिमेनिमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी सहप्रशासकीय अधिकारी प्रा. राहुल भालेकर सर, उपशिक्षणाधिकारी श्री. रवींद्र जोशी सर, श्री. अनिल पवार सर, प्राचार्य डॉ. निळकंठ वडजे सर तसेच संस्था कार्यालयातील श्री. सुरेश ठेंग, श्री. आप्पासाहेब नाटकर, श्री. नामदेव शेळके आणि श्री. गणेश तारख उपस्थित होते.

मान्यवरांच्या या सदिच्छा भेटीमुळे संस्थेच्या शैक्षणिक कार्याला नवी प्रेरणा व बळ मिळाले

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911